# वृत्तपत्रीय निवेदन

**निवृत्तीवेतन निधी नियमन व विकसन प्राधिकरण ( PFRDA ) व महाराष्ट्र राज्य स्तर अग्रणी बँकर्स समिती ( SLBC ) यांचेकडून अटल निवृत्ती वेतन योजनेबाबत पुणे येथे महत्वपूर्ण आढावा बैठक**

४ जानेवारी २०२३ : अटल निवृत्तीवेतन योजनेची व्याप्ती वाढविण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र राज्य स्तर अग्रणी बँकर्स समितीने दिनांक ४ जानेवारी २०२३ रोजी पुणे येथे अटल निवृत्तीवेतन योजना आढावाऽ बैठक आयोजित केली होती. बँक ऑफ महाराष्ट्रचे कार्यकारी संचालक श्री ए बी विजय कुमार हे बैठकीच्या अध्यक्षस्थानी व निवृत्तीवेतन निधी नियमन व विकसन प्राधिकरणाचे कार्यकारी संचालक श्री ए जी दास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. आपल्या संबोधनात श्री ए बी विजय कुमार यांनी सर्व सभासद बँकांना अटल निवृत्ती वेतन योजना महाराष्ट्र राज्याच्या कानाकोपऱ्यातील प्रत्येक गावात सक्रियपणे घेऊन जाण्याचे आवाहन केले.

आपल्या प्रास्ताविक भाषणात श्री दास यांनी आपल्या देशातील लोकांना त्यांच्या वृद्ध वयात सुरक्षित उत्पन्न मिळण्याच्या गरजेवर भर दिला. बँकांनी केलेल्या उत्कृष्ट कामाबद्दल त्यांनी बँकांचे अभिनंदन केले व अटल निवृत्ती वेतन योजना संपृक्त होईपर्यंत आपले हे कार्य सुरूच ठेवण्याचे आवाहन त्यांनी बँकांना केले. यानंतर निवृत्तीवेतन निधी नियमन व विकसन प्राधिकरणाचे सहाय्यक सरव्यवस्थापक डॉ आशिष डोंगरे यांनी योजनेची वैशिष्ट्ये व लाभांच्या बाबत चर्चा करणारे सादरीकरण केले. दिनांक ३१ डिसेंबर २०२२ पर्यंतच्या सुमारे ३८.३० लाख एवढ्या एकूण नोंदणीसह महाराष्ट्राने देशामध्ये तिसरा क्रमांक पटकावला असला तरीही हे नोंदणीचे प्रमाण राष्ट्रीय सरासरी पेक्षा काहीसे कमी असल्याचे त्यांनी नमूद केले.

अटल निवृत्ती वेतन योजनेच्या अंतर्गत नोंदणी होण्यासाठी उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल विदर्भ कोकण ग्रामीण बँक, महाराष्ट्र ग्रामीण बँक, इंडियन ओव्हरसीज बँक, भारतीय स्टेट बँक, बँक ऑफ इंडिया, युनियन बँक ऑफ इंडिया, धनलक्ष्मी बँक, बँक ऑफ महाराष्ट्र व कॅनरा बँक या बँका व हिंगोली, गोंदिया, जालना, परभणी , नांदेड, बीड, यवतमाळ, भंडारा, वाशीम, व गडचिरोली जिल्ह्याच्या अग्रणी बँक व्यवस्थापकांचा या बैठकीत सत्कार करण्यात आला.

अटल निवृत्ती वेतन योजना ही केंद्र शासनाची हमी असलेली निवृत्तीवेतन योजना असून निवृत्तीवेतन निधी नियमन व विकसन प्राधिकरणातर्फे योजनेचे व्यवस्थापन करण्यात येते. कोणत्याही टपाल कार्यालय किंवा बँकेच्या शाखेत बचत खाते सुरु करून देशातील १८ – ४० वयोगटातील कोणताही नागरिक या योजनेत सहभागी होऊ शकेल. सदर योजनेच्या अंतर्गत वर्गणीदाराने केलेल्या योगदानानुसार त्याच्या वयाच्या ६०व्या वर्षापासून वर्गणीदाराला रु १००० ते रु ५००० पर्यंत निवृत्ती वेतन मिळू शकेल. वर्गणीदाराच्या निधनानंतर त्याच्या जोडीदारास देखील तेवढेच निवृत्त वेतन मिळेल. दोन्ही वर्गणीदारांच्या निधनानंतर वर्गणीदारांच्या वयाच्या ६० वर्षेपर्यंत संकलित झालेला निधी त्यांच्या वारसदारास अदा

करण्यात येते. विविध संवर्गातील बँका व टपाल कार्यालयासह २६६ नोंदणीकृत अटल निवृत्ती वेतन सेवा पुरवठादारांच्या माध्यमातून योजनेचे वितरण करण्यात येते. देशातील ४.९५ कोटी वर्गणीदरांनी अटल निवृत्ती वेतन योजनेत आपली नोंदणी केली आहे.

निवृत्तीवेतन निधी नियमन व विकसन प्राधिकरण व महाराष्ट्र राज्य स्तर अग्रणी बँकर्स समिती हे राज्यातील सर्व नागरिकांची अटल निवृत्ती वेतन योजनेत नोंदणी होण्यासाठी आपले प्रयत्न जोमाने जारी ठेवतील व भारत देशाला एक निवृत्ती वेतनित समाज बनविण्यात आपले योगदान देत राहतील असे श्री दास यांनी सांगितले.

महाराष्ट्र राज्य स्तर अग्रणी बँकर्स समितीचे सदस्य सचिव व उपसरव्यवस्थापक  श्री आर डी देशमुख यांच्या आभार प्रदर्शनानंतर कार्यक्रम संपन्न झाला.   .

********************************

